ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २३ मार्च, १९५५ | अंक १२

## विविध माहिती

**सुखकर हवा राखणाऱ्या मोटारी**—पंजाब सरकारनें राज्यांतील मोटारींची प्रवासी वहातूक आपल्या ताब्यांत घेतलेली आहे. पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास चंदीगड ते दिल्ली ह्या मार्गावर हवामान सुखकर राखणाऱ्या कांहीं मोटारी राज्य–सरकार चालू करणार आहे. मोटारींत मुतारींचीहि सोय करण्यांत येणार आहे. भाड्याचा आकार नेहमीपेक्षा दीडपट राहील.

**कारखान्याच्या उत्पादनांत वाढ**—कलकत्ता येथील नॅशनल इनस्ट्रुमेंटस फॅक्टरी हा कारखाना १०० वर्षांपूर्वी स्थापन झालेला आहे. १९५४–५५ ह्या वर्षाच्या पहिल्या ११ महिन्यांत कारखान्याच्या उत्पादनांत ३१ टक्के वाढ झाली आहे. ही टक्केवारी १९५३–५४ च्या ह्याच कालाच्या तुलनेनें काढण्यांत आली आहे. उत्पादनाची एकूण किंमत २० लाख रुपये आहे.

**मुंबई–राजस्थान प्रवासी मोटारी**—मुंबई–राज्य व राजस्थान ह्यांच्या दरम्यान प्रवासी मोटारींची वाहतूक सुरू होणार आहे. सध्यां मुंबई राज्यांतील स्टेट–ट्रॅन्सपोर्ट उत्तर–गुजराथ मधील कांहीं रस्त्यांवर वाहतूक करीत आहे. त्यांतील कांहीं रस्ते राजस्थानच्या सरहद्दीजवळपर्यंत गेलेले आहेत. अशा रस्त्यांवर उभय राज्यांत प्रवासी वाहतूक सुरू करण्यासंबंधीं सध्यां विचार चालू आहे.

**शेतकी तज्ज्ञांची देवाण–घेवाण**—रशिआ व अमेरिका ह्या उभयता देशांतील शेतकी–विषयक तज्ज्ञांच्या मंडळांनीं एकमेकांच्या देशांना भेटी याव्या ह्या सूचनेचा अमेरिकन सरकार विचार करीत आहे. ही सूचना प्रथम रशिआतर्फे करण्यांत आली असून अशा प्रकारच्या भेटींचा उपयोग होईल असें सूचनेसंबंधींच्या रशिअन विनंतींत म्हटलें होतें.

**काश्मीर सरकारला कर्ज**—काश्मीर सरकारला भारत सरकारकडून आतांपर्यंत ९,६१,०५,००० रुपये कर्ज मिळालें आहे. ह्या रकमेपैकी ५,९२,५५,००० एवढी रक्कम शेख अब्दुल्ला ह्यांचें सरकार अधिकारावर असतांना मिळालेली आहे. बाकीची रक्कम बक्षी गुलाम महंमद ह्यांनीं नवें सरकार स्थापन केल्यावर मिळालेली आहे.

**कर्ज उभारण्यासाठीं परवानगी द्या**—सुरत शहरासाठीं पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठीं आणि ड्रेनेजची योजना करण्यासाठी ३० लाख रुपयांचें कर्ज उभारण्याची परवानगी म्युनिसिपालिटीतर्फे मुंबई सरकारकडे मागण्यांत आली आहे. कर्जावर दरसाल दरशेंकडा ४॥ टक्के व्याज देण्यांत येणार असून तें १२ वर्षांत परत करण्यांत येणार आहे.

**गुरांची अवलाद सुधारण्याचे प्रयत्न**—मध्य प्रदेशांतील गुरांचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य–सरकारनें गुरांची कृत्रिम गर्भधारणा करण्याची योजना आंखली आहे. अशा प्रकारें गुरांची निपज करण्याचीं आठ केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. त्याशिवाय शेळ्या व मेंढ्या ह्यांची जात सुधारण्याचेहि प्रयत्न करण्यांत येणार आहेत.

**कॅनडाकडून मिळणारीं रेल्वेचीं एंजिनें**—कोलंबो मदत–योजनेप्रमाणें भारताला कॅनडाकडून १२० रेल्वे एंजिनें मिळावयाचीं आहेत. त्यांपैकीं कांहीं एंजिनें कॅनेडिअन लोकोमोटिव्ह कंपनीच्या कारखान्यांत नुकतीच तयार झालीं. एंजिनांची चांचणी घेतांना भारताचे कॅनडामधील हाय कमिशनर हे पहिल्या एंजिनांत बसले होते.

**कच्छ–मांडवी राज्याचा विकास**—पुढील आर्थिक वर्षांत कच्छ–मांडवी राज्यांतील कांडला ह्या बंदरावर ४०० लाख रुपये आणि गांधी–धाम ह्या गांवावर ७७ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. राज्य–सरकारला आर्थिक विकासासाठी मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें ६३४ लाख रुपये मंजूर केले आहेत. राज्याच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज ४५,४६,००० रु. करण्यांत आला आहे.

**पोलिसांची राहण्याची सोय**—गोध्रा येथें पोलिसांना राहण्यासाठीं ८४ बिऱ्हाडांच्या जागा बांधण्यांत आल्या आहेत. ह्या वस्तींचें उद्घाटन करतांना इन्स्पेक्टर–जनरल ऑफ पोलिस श्री. कामटे ह्यांनीं असें सांगितलें कीं, मुंबई सरकार दर वर्षी १,२१० पोलिस क्वार्टर्स बांधणार आहे. ह्या कार्यक्रमामुळें पुढील पांच वर्षांत सर्व पोलिसांना राहण्याच्या सरकारी जागा मिळतील.

**औषधपाण्यासाठीं नवे दवाखाने**—मध्य–प्रदेश सरकारनें लोकांना स्वस्त औषधपाणी पुरविण्यासाठी अलोपॅथिक पद्धतीचे चार नवे दवाखाने ग्रामीण विभागांत उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या दवाखान्यांसाठीं सरकारला ६८,६५२ रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय आयुर्वेदिक पद्धतीचे २५ दवाखाने उघडण्यांत येणार आहेत. आयुर्वेदिक दवाखान्यांना २७,४२० रुपये खर्च येईल.

**अहमदाबाद शहरासाठीं दूध–योजना**— अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें एप्रिल महिन्याच्या तीन तारखेपासून शहरांतील नागरिकांना शुद्ध व स्वस्त दुधाचा पुरवठा करण्याची योजना आंखली आहे. दुधाच्या बंद बाटल्या नागरिकांना घरपोंच करण्यांत येतील. ही योजना प्रायोगिक स्वरूपाची असून ती प्रथमतः १२ महिनेच चालू ठेवण्यांत येणार आहे.

**मराठवाड्यासाठी नभोवाणी केंद्र**— हैद्राबाद राज्यांतील मराठवाडा भागासाठी ५ किलोवॅट शक्तीचें नभोवाणी केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. नभोवाणी केंद्रासाठीं योग्य अशा जागेची निवड करण्यासाठीं ऑल इंडिआ रेडिओचे मुख्य एंजिनिअर लवकरच त्या भागांत जाणार आहेत.

**पाकिस्तानकडून तुपाची खरेदी**—पाकिस्ताननें अमेरिकेकडून ४० लाख पौंड तूप विकत घेतलें असल्याचें अमेरिकेच्या शेतकी खात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. ह्या तुपासाठीं पाकिस्ताननें अमेरिकेला २० लाख डॉलर्स दिले. अमेरिकेकडून तुपाच्या विक्रीचा झालेला हा पहिलाच सौदा आहे, असें समजतें. अमेरिकन तुपाचा भाव दर पौंडाला ५८ सेंट असा आहे. पण पाकिस्तानला ५० सेंट ह्या भावानें तूप देण्यांत आलें आहे.

**वेंगुर्ल्याजवळ लोखंडाची माती**—वेंगुर्ल्याजवळील एका गांवीं लोखंडाची माती विपुल प्रमाणांत सांपडली आहे. नव्यानें सांपडलेल्या खाणींत ३०० मजूर काम करीत आहेत. सुमारें १०,००० टन माती घेऊन वेंगुर्ला बंदरांतून एक बोट लवकरच प. जर्मनीला जाणार आहे. सरकारनें खाणीसंबंधीं जरूर तो परवानाहि दिला आहे. ह्या भागांतील बऱ्याच बेकारांना खाणींत काम मिळेल.

**कोपरगांव येथील साखरेचा कारखाना**—कोपरगांव तालुक्यांत निघणाऱ्या सहकारी साखर–कारखान्याची नोंद पुणें येथील रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ह्यांच्याकडे करण्यांत आली. नगर जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर काढण्यांत येणारा हा पांचवा साखरेचा कारखाना आहे. कारखान्याचें वसूल भांडवल ४ लाख रुपये असून भागीदारांची संख्या ८५० आहे. ४,२०० एकर जमीन कारखान्यानें खंडानें लागवडीसाठीं घेतली आहे.

**पेप्सु राज्यांत स्टेट ट्रॅन्सपोर्ट**—पतिआळा आणि पूर्व पंजाब राज्य सरकारनें राज्यांतील रस्त्यावरील मोटारींची वाहतूक येत्या एप्रिलपासून आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याची योजना नियोजन–समितीनें तपासून पाहिली व नंतर तिला मान्यता दिली.

**न्यायाधीशाचा नवा व्यवसाय**—मद्रास हायकोर्टाचे सर न्यायाधीश श्री. राजमन्नार हे सेवानिवृत्त झाल्यानंतर चित्रपटाच्या व्यवसायांत पदार्पण करण्याचा विचार करीत आहेत, असें समजतें. दिल्ली येथें चित्रपट–विषयक बाबींचा विचार करण्यासाठीं जी सर्व संग्राहक परिषद् भरली होती, तिचे ते अध्यक्ष होते.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्याची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः–कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २३ मार्च, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## धंद्यांचें राष्ट्रीयीकरण आणि बोनस

खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या कामगारांना नफ्यांतून बोनस देण्याची पद्धत अलीकडे रूढ झालेली आहे. पण राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या धंद्यांत नफा झाल्यास त्यांतून कामगारांना बोनस द्यावा किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. हैद्राबाद राज्यांतील स्टेट ट्रॅन्स्पोर्टपुरता तरी ह्या प्रश्नाचा निकाल नास्तिपक्षी लागला आहे. हैद्राबाद राज्याच्या विधिमंडळांतील विरोधी पक्षांनीं राज्याच्या मालकीच्या मोटार-वहातुकीच्या धंद्यांतील कामगारांना बोनस देण्यांत यावा, अशी मागणी केली होती. ह्या मागणीला राज्याचे गृहमंत्री श्री. बिंदु ह्यांनीं स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. विरोधी पक्षाला उत्तर देतांना ते म्हणाले, कीं ज्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें आहे त्यांतील कामगारांना बोनस देण्यास सरकारचा तत्त्वतः विरोध आहे. ह्या धोरणापासून सरकार चळणार नाहीं. सरकारच्या मालकीच्या धंद्यांतील कामगारांना नफ्यांत वाटा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण, ह्या धंद्यापासून होणारें उत्पन्न सरकारच्या मामुली उत्पन्नांत जमा करण्यांत येतें आणि सरकार आपल्या उत्पन्नाचा विनियोग वहातुकीच्या साधनांचा विस्तार करण्यासाठीं आणि इतर विकासयोजना अंमलांत आणण्यासाठीं करतें. राज्यांतील प्रवासी मोटारींचा दर प्रत्येक मैलाला १ आणा आहे तो ९ पै करण्यांत यावा अशीहि मागणी करण्यांत आली होती. तिला नकार देतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, भाड्याचा दर जर आजच उतरविण्यांत आला तर वाहतुकीचा दर्जा घसरण्याची भीति आहे. शिवाय, वाहतुकीचा विस्तार करण्याचें घाटत असतांना भाड्याचा दर कमी करणें योग्य होणार नाहीं. मुंबई व मद्रास राज्यांतील स्टेट ट्रॅन्सपोर्टची खातीं, उलट, भाड्यांत वाढ करण्याचा विचार करीत आहेत.

---

## लहान विमा-कंपन्यांची परिषद

भारतामधील मध्यम व छोट्या विमा-कंपन्यांच्या परिषदेचें दुसरें अधिवेशन मुंबई येथें भरलें होतें. स्टर्लिंग जनरल इन्शुरन्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एम्. जे. शेठ हे अध्यक्षस्थानीं होते. कांहीं विमा-कंपन्यांनीं स्टाफ इन्शुरन्स विमा-योजना काढल्या आहेत. त्या योजनांविरुद्ध परिषदेंत बरीच टीका करण्यांत आली आणि सरकारनें अशा योजना बंद कराव्या अशी जोराची मागणी करण्यांत आली. त्याचप्रमाणें विमा-कंपन्यांनीं हप्त्यांच्या दरांत जी भारी कपात केली आहे, त्याविरुद्धहि परिषदेंत मत व्यक्त करण्यांत आलें. विमेदारांना देण्यांत येणाऱ्या बोनसचे आंकडे भरमसाठ वाढविण्यांत आल्याबद्दल परिषदेंत नापसंती व्यक्त करण्यांत आली. सध्यां विम्याचे जे कमी हप्ते प्रचलित आहेत त्यांच्याशीं जुळतील इतकेंच बोनस जाहीर करण्यांत यावें, अशी व्यवस्था सरकारनें करावी ह्या अर्थाची मध्यवर्ती सरकारला विनंति करण्यांत आली. मध्यम व छोट्या प्रतीच्या विमा-कंपन्यांपुढें सध्या मुख्य प्रश्न खर्चाच्या प्रमाणाचा आहे. बऱ्याच चर्चेनंतर खर्चाच्या प्रमाणाचें एक कोष्टक परिषदेनें मंजूर केलें. श्री. शेठ आपल्या भाषणांत म्हणाले कीं, कांहीं बड्या विमा-कंपन्यांत अग्रेसरत्व मिळविण्यासाठीं जी वेडी स्पर्धा चालू आहे, तीमुळें ह्या धंद्याची अखेर जवळ आल्याखेरीज राहणार नाहीं. जुन्या कंपन्यांनीं स्वतः जगावें आणि दुसऱ्यांना जगूं द्यावें. अजून सर्वच कंपन्यांना चांगला वाव आहे. ज्या विमा-कंपन्या मुळांतच बळकट नाहींत, त्या आपोआपच नामशेष होतील. परंतु ज्या विमा-कंपन्या आतांपर्यंत चालू आहेत, त्यांना अनियंत्रित स्पर्धेची बाधा होऊन त्या बंद पडणें हें इष्ट ठरणार नाहीं. छोट्या कंपन्या बंद व्हाव्या अगर त्यांनीं मोठ्या कंपन्यांत विलीन व्हावें, अशी सरकारची इच्छा आहे काय? अशीहि त्यांनीं पृच्छा केली आहे.

---

## पाकिस्तानमध्यें पोलादाचा कारखाना

पाकिस्ताननें आपला औद्योगिक विकास साधण्यासाठीं निमसरकारी स्वरूपाचें इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन स्थापन केलें आहे. ह्या कॉर्पोरेशननें पाकिस्तानांत काढण्यांत यावयाच्या एका पोलादाच्या कारखान्याची योजना आतां पक्की केली आहे. कारखान्याला सुमारें २० कोटि रुपये भांडवल लागेल. दरवर्षी अंदाजें १,००,००० टन पोलादाची निर्मिति कारखाना करूं शकेल. पाकिस्तानांत लोखंडाच्या खाणी कोठें निघण्यासारख्या आहेत किंवा नाहींत, ह्याचा भूस्तरविषयक अभ्यास करण्याचें काम सुप्रसिद्ध जर्मन कंपनी क्रॅप्स हिच्याकडे सोंपविण्यांत आलें होतें. सदर कंपनीच्या तज्ज्ञांनीं आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. पंजाबांत एकाच ठिकाणीं लोखंडाची माती इतक्या विपुल प्रमाणांत आहे, कीं तिचा उपयोग करून दरवर्षी २,५०,००० टन लोखंड निर्माण करतां येईल, असा अभिप्राय अहवालांत व्यक्त करण्यांत आला आहे. जर्मन कंपनीचे तज्ज्ञ आणखीहि कांहीं ठिकाणीं खनिजांचा शोध करीत असून दुसऱ्या कांहीं ठिकाणीं लोखंडाच्या खाणी सांपडतील अशी त्यांची अपेक्षा आहे. संकल्पित पोलादाच्या कारखान्याची उभारणी ह्याच कंपनीकडे सोंपविण्यांत आली आहे. भांडवल उभारणीच्या बाबतींत कॉर्पोरेशन जागतिक बॅंकेकडून कर्ज मिळविण्याची खटपट तर करणार आहेच, पण त्याशिवाय अमेरिकेंतील खाजगी भांडवलदारांना कारखान्यांत भांडवल गुंतविण्याविषयींहि आवाहन करण्यांत येत आहे. अमेरिकेंतील खाजगी भांडवलाप्रमाणेंच इतर पुढारलेल्या देशांतूनहि खाजगी भांडवल आकर्षित करण्याचे प्रयत्न चालूं आहेत. पाकिस्तानांत कारखान्यांना लागणाऱ्या औद्योगिक शक्तीचा तुटवडा आहे. तथापि, संकल्पित कारखान्यांत जळण म्हणून गॅसचा उपयोग करण्याचा विचार आहे.

---

# THE BANK OF MAHARASHTRA LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1954.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 50,00,000—0—0 |
| **Issued and Subscribed Capital** 64,000 Shares of Rs. 50/-each ... | | 32,00,000—0—0 |
| **Called and paid up Capital** 64,000 Shares of Rs. 50/- each Rs. 25/- per share called and paid up ... | | 16,00,000—0—0 |
| **Calls in Advance** ... | | 150—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** ... | | |
| As per last Balance Sheet ... | 6,16,000—0—0 | |
| Additions during the year ... | 84,000—0—0 | 7,00,000—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 1,31,15,777—2—6 | |
| Savings Bank Deposits ... | 1,69,23,563—9—11 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 1,10,89,025-14—3 | 4,11,28,366-10—8 |
| **4 Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (i) In India ... | Nil | |
| (ii) Outside India ... | Nil | Nil |
| **Particulars:** | | |
| (i) Secured ... | ... | |
| (ii) Unsecured ... | ... | |
| **5. Bills Payable:** ... | | 3,68,885-11—4 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 20,14,972-12—7 | |
| (ii) Payable outside India ... | Nil | 20,14,972-12—7 |
| **7. Other Liabilities:** | | |
| Unpaid dividend ... | 12,756—8-11 | |
| Rebate on bills discounted ... | 2,602—9—0 | |
| Branch adjustments ... | 2,98,274—0—9 | 3,13,633—2—8 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** | | 3,88,780—0—0 |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 3,47,227-12—4 | |
| Less appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 84,000—0—0 | | |
| Provision for Income-tax and Super-tax Rs. 1,47,000—0—0 | | |
| Dividend Rs. 80,000—0—0 | 3,11,000—0—0 | |
| | 36,227-12—4 | |
| Add Profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account. ... | 3,24,721—2—4 | 3,60,948-14—8 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 1,37,400—0—0 | |
| Total Rs. ... | | 4,68,75,737—3-11 |

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

***Balance Sheet as at 31st December 1954***

## PROPERTY AND ASSETS

| Particulars | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including foreign currency notes) ... | | | 50,56,090-11-11 |
| **2. Balances with Other Banks (In current account)** | | | |
| (i) In India ... | | 4,89,652-12-10 | |
| (ii) Outside India ... | | Nil | 4,89,652-12-10 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | | 10,00,000—0—0 |
| **4. Investments**: Securities—At or below redemption value. | | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these securities of the face value of Rs. 79,06,000/- are with banks for over-draft arrangements) (Market value Rs 1,53,06,025—9—0). (Face value Rs. 1,60,40,900-0-0) ... | | 1,57,86,257—7—4 | |
| (ii) **Shares: At or below cost.** | | | |
| **Ordinary Shares (fully paid up)** **(Market value Rs. 1,34,845-6-0)** | **Rs. 1,17,875—8—3** | | |
| **Preference shares (fully paid-up)** **(Market value Rs. 3,55,769-4-0)** | **Rs. 3,42,370—4—6** | | |
| **Ordinary shares (partly paid-up)** **(Market value Rs. 43,498-4-0)** | **Rs. 42,239—4—0** | 5,02,485—0—9 | |
| (iii) **Debentures or Bonds: At cost** **(Market value Rs. 14,350/-)** ... | | 14,000—0—0 | |
| (iv) Other Investments: ... | | | |
| Stock for £ 200 @ cost Rs. 8,200 | Rs. 8,200—0—0 | | |
| Less received towards repayment of capital | Rs. 5,979—3-10 | 2,220-12—2 | |
| (v) Gold ... | | Nil | 1,63,04,963—4—3 |
| **5. Advances** | | | |
| (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | | |
| (1) Loans, Cash-Credits, Over-drafts, etc. | | | |
| (i) In India | Rs. 1,93,04,282—2—0 | | |
| (ii) Outside India | Nil | 1,93,04,282—2—0 | |
| (2) **Bills discounted and purchased (excluding Treasury Bills of the Central & State Governments).** | | | |
| **(i) Payable in India** | **Rs. 5,40,848-4—10** | | |
| **(ii) Payable outside India.** | **Nil** | 5,40,848—4-10 | 1,98,45,130—6-10 |
| **Particulars Of Advances** **(*See Page 94*)** | | | |
| **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per Contra** | | | |
| **(i) Payable in India** ... | | 20,14,972-12—7 | |
| **(ii) Payable outside India** ... | | Nil | 20,14,972-12—7 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** ... | | | 3,88,780—0—0 |
| **8. Fixed Capital Expenditure** | | | |
| **(1) Land & Building—At Cost** | | | |
| As at 31-12-1953 | Rs. 7,66,406—7—9 | | |
| Add additions and adjustments | Rs. 65,298—7—6 | | |
| | Rs. 8,31,704-15—3 | | |
| Less depreciation to date | Rs. 30,484-15—3 | 8,01,220—0—0 | |
| **(2) Safe Deposit Vault—at Cost** | | | |
| As per last Balance Sheet | Rs. 1,69,801—3—6 | | |
| Additions during the year | Rs. 52,635—3—9 | | |
| | Rs. 2,22,436—7—3 | | |
| **Less depreciation to date** | **Rs. 23,338—2—3** | 1,99,098—5—0 | 10,00,318—5—0 |
| **9. Furniture, Fixtures, Motor Car Etc.—at Cost** | | | |
| **As per last Balance Sheet** ... | | 2,97,699—3—2 | |
| **Additions during the year** ... | | 39,481—9—3 | |
| | | 3,37,180-12—5 | |
| **Less depreciation to date** ... | | 76,724—5—3 | 2,60,456—7—2 |
| **10. Other Assets Including Silver** | | | |
| **Stamps on hand** ... | | 2,105—4—6 | |
| **Tax paid in advance and at source** ... | | 2,56,393—5—8 | |
| **Interest accrued on investments** ... | | 77,529—1-10 | |
| **Sundry advances** ... | | 58,344-11—4 | |
| **Shares of the Executor and Trustee Co. (Partly paid-up)** | | 1,21,000—0—0 | 5,15,372—7—4 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | Nil | Nil |
| Total Rs. ... | | | 4,68,75,737—3-11 |

# THE BANK OF MAHARASHTRA LIMITED, POONA.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1954 on page 93.**

| | Particulars of Advances:— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (i) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 1,61,07,825–10—8 |
| (ii) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 8,64,215—3—8 |
| (iii) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the debtors. ... | 28,73,089—8—6 |
| (iv) | Debts considered doubtful or bad, not provided for. ... | Nil |
| | | 1,98,45,130—6–10 |
| (v) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 9,05,503–13—9 |
| (vi) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 15,18,715—7—2 |
| (vii) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 9,08,954–14—6 |
| (viii) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as members. ... | 19,77,564–11—8 |
| (ix) | Due from Banking Companies. (Secured) ... | 81,870–11—8 |
| | (Unsecured) ... | 2,71,124—2—9 |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1954***

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | 6,50,002–12—6 | INCOME: (Less provision made during the year for bad and doubtful debts & other usual or necessary provisions). | |
| 2. Salaries and allowances and Provident Fund. ... Manager 16,300—0—0; Others 4,70,624–12—5 | 4,86,924–12—5 | 1. Interest and discount. ... | 15,60,089–15—9 |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | 9,200—0—0 | 2. Commission, exchange, brokerage. | 1,46,962–12—8 |
| 4. Rent, taxes, insurance, lighting, etc. ... | 54,559—8–10 | 3. Rent (Less taxes and other charges) | 9,391—2—9 |
| 5. Law charges. ... | 9,856–12—0 | 4. Net profit on sale of investments, gold and silver, land premises and other assets, (not credited to reserves or any particular fund or account) | Nil |
| 6. Postage, telegrams, stamps and telephone ... | 34,512—4—6 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account.) ... | Nil |
| 7. Auditors' fees. ... | 2,500—0—0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property | 58,065—6—9 | | |
| 9. Stationery, printing, advertisement, etc. ... | 65,002—4—7 | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. ... | Nil | | |
| 11. Other expenditure: ... Sundry charges 30,142-1-0; Travelling & conveyance 14,776-9-3 | 44,918–10—3 | 7. Other receipts: Transfer fees, 1,302—6—0; Lockers rental 22,517—5—0 | 23,819–11—0 |
| 12. Balance of profit (Subject to taxation) carried to Balance Sheet | 3,24,721—2—4 | | |
| Total Rs. ... | 17,40,263–10—2 | Total Rs. ... | 17,40,263–10—2 |

**Statement pursuant to Section 132-A of the Indian Companies Act of 1913 as amended by Act XXII of 1936.**

The profit of the subsidiary company viz. The Maharashtra Executor and Trustee Company Limited for the year ended 31st December 1954 has been carried forward into the accounts of that company.

**P. V. Agashe**, *Accountant* **C. V. Joag**, *Manager* **V. P. Varde**, *Chairman*

Poona City, 30th January, 1955.

S. G Marathe. N. G. Pawar M. R. Joshi F. D. Pudumjee
D. K. Sathe M. V. Shah B. M. Gupte S. L. Kirloskar } *Directors*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Ltd., as at 31st December, 1954, and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited accounts of Bombay, Girgaon, Dadar, Sholapur (Phaltan Galli and Murarji Peth) and Nagpur Branches and certified returns of other Branches incorporating therein Assets and Liabilities which are taken over from Banthia Bank Ltd., Panvel, during the audit year and report that:— (*a*) We have obtained all the information and explanations we have required; (*b*) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law: (*c*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank; and (*d*) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130, of the Indian Companies Act.

We have to report further that: (*e*) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (*f*) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank, (*g*) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit, (*h*) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona City, 30th January, 1955.

**G. D. APTE**, B. A., G. D. A., F. C. A. *Chartered Accountant, Poona 2.*

**KULKARNI and KHANOLKAR**, *Chartered Accountants, Bombay.*

## दि बेळगांव बँक लि.

### डायरेक्टरांचा रिपोर्ट

दि बेळगांव बँक लि. ला आधींच्या वर्षीचा १,४७७ रुपये शिल्लक नफा धरून, १९५४ सालीं ८४,८४५ रु. नफा झाला. त्याची वांटणी डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें सुचविली आहे:—

| | रु. |
|---|---|
| (१) ५% डिव्हिडंड + १½% रौप्यज्युबिली बोनस (करमाफ) | ३७,००० |
| (२) रिझर्व्ह फंड | १७,००० |
| (३) बॅड डेट रिझर्व्ह फंड | ६,००० |
| (४) इन्व्हेस्टमेंट फंड | ३,००० |
| (५) इन्कमटॅक्स तरतूद | २०,००० |
| (६) पुढील वर्षांत ओढण्यासाठीं | १,३४५ |
| | रु. ८४,८४५ |

बँकेचा व्यवहार समाधानकारक झाला. ठेवी एकसारख्या वाढत गेल्या आहेत. त्या प्रमाणांत सरकारी रोख्यांतील गुंतवणूक वाढली आहे; त्यामुळें नेहेमींप्रमाणें तरत्या पैशाची उच्च पातळी कायम राहिली आहे.

बँकेचा रौप्यमहोत्सव अहवालाचे वर्षीं मोठ्या उत्साहानें साजरा झाला. भारत सरकारचे गृहमंत्रि, डॉ. कैलासनाथ काटजू हे मुख्य पाहुणे होते. उपगृहमंत्रि श्री. बी. एन. दातार हेहि उपस्थित होते. समारंभासाठीं बँकेच्या शाखांच्या ठिकाणचेहि बँकेचे प्रमुख खातेदार आले होते.

महोत्सवानंतर बँकेच्या प्रगतीस आणखी जोराची चालना मिळाली आहे. मुख्य कचेरींतील आधुनिक सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें काम समाधानकारक चालू आहे. शाखांचें कामहि चांगलें चाललें आहे. गेल्या वर्षीं जयसिंगपूर येथें उघडलेल्या शाखेला जनतेकडून उत्साहकारक पाठिंबा मिळत आहे. बँकेकडील एकूण ठेवींत ११ लाखांची भर पडली आहे.

### संक्षिप्त ताळेबंद


| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ६,००,००० | कॅश बँकांत, इ. | २७,१०,७६९ |
| रिझर्व्ह, इतर फंड | २,१९,९२६ | इन्व्हेस्टमेंटस् | ३९,०५,८९५ |
| ठेवी | ९५,४५,७७२ | कर्जे | ३९,१३,३७९ |
| नफा | ८३,३६८ | इमारत, इ. | २,१०,२०३ |
| एकूण | १,१७,०५,१०९ | एकूण | १,१७,०५,१०९ |

### चित्रतारकांच्या भरमसाट मागण्या

मिस लोलो ब्रिगिडा ह्या इटालियन नटीनें एका बोलपटांत काम करण्यासाठी २॥ लक्ष पौंड मागितले, त्यावर टीका करतांना ऑब्झर्वेटर रोमॅनो ह्या वृत्तपत्रानें म्हटलें आहे, कीं नटीच्या नैसर्गिक सौंदर्यावरच केवळ तिचें वेतन अवलंबून ठेवणें चुकीचें आहे; तिची हुशारी व शिक्षण ह्यांचाहि विचार झाला पाहिजे. सर्जन्स व संशोधक ह्यांच्या प्राप्तीच्या मानानें दिखाऊ गुणाच्या नट्यांना कितीतरी भरमसाट प्राप्ति होते !

### भारतामधील दरमाणशीं उत्पन्न

भारतामधील दरमाणशीं वार्षिक उत्पन्न १९५२–५३ मध्यें २६७ रु. होतें, तें १९५३–५४ मध्यें २८४ रु. झालें. १९४८–४९ मधील किंमतींच्या हिशेबानें, उत्पन्नाचे हे आंकडे अनुक्रमें २५८ रु. व २६६ रु. असे होतात.




## दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर, लि.

### डायरेक्टरांचा अहवाल

१९५४ हें वर्ष उद्योगधंद्यांना व बँकिंगला विशेष चांगलें गेलें नाहीं. गेल्या दोन वर्षांत, कोल्हापुरांतील दोन बँकांनीं आपले व्यवहार स्थगित केले. त्यामुळें निर्माण झालेलें वातावरण अद्याप पूर्णपणें निवळलेलें नाहीं. म्हणून, नेहमींच्यापेक्षा पुष्कळच ज्यास्त रक्कम रोख बाळगून ठेवीदारांचें हित पाहणें श्रेयस्कर होतें व त्याप्रमाणें युनियन बँकेनें केलें आहे. बँकेला तिच्या स्थापनेपासून केव्हांहि तोटा अनुभवास आलेला नाहीं. बँकेवर ठेवीदार, भागीदार व हितचिंतक ह्यांनीं ठेवलेला विश्वास अभिमानास्पद आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस २०,०५८ रु. नफा झाला. मागील शिलकी नफा ७० रु. होता. नफावाटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | रु. |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | ५,००० |
| बॅडडेट व कॉन्टिन्जन्सी फंड | १,००० |
| इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड | २,००० |
| डिव्हिडंड (३% करमाफ) | ५,३३३ |
| कराची तरतूद | ६,७०० |
| पुढील वर्षांत ओढले | ९५ |
| | रु. २०,१२८ |

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | १,७९,८२५ | रोख बँकांत इ. | ६,२५,५६१ |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,३०,००० | इन्व्हेस्टमेंटस् | ५,८९,६५२ |
| ठेवी | १९,८२,०६१ | कर्ज | ९,४५,३२९ |

### ब्रिटिश मोटारींचें वाढलेलें उत्पादन

ग्रेट ब्रिटनमध्यें १९५४ मध्यें एकूण १०,३८,८३४ मोटारगाड्यांचें उत्पादन झालें. त्यांपैकीं ७,७०,००० खासगी वापराच्या मोटार-गाड्या होत्या व बाकीचीं भाडोत्रीं वापराचीं वहानें होतीं. १९५२ चे मानानें हें उत्पादन २,००,००० नगांनीं जास्त आहे. दररोजच्या कामाच्या वेळांत दर दहा सेकंदास एक मोटार-गाडी, ह्या वेगानें आतां उत्पादन होत आहे. युद्धापूर्वी, १९३७ मध्यें उत्पादनानें उच्चांक गांठला होता; तेव्हांच्या मानानें १९५४ मधील उत्पादन दुप्पट आहे. निर्गत मोटारींची किंमत ३४ कोटी पौंड भरली.

## आशिआला अमेरिकेची आर्थिक मदत

आशिआ खंडांतील राष्ट्रांना अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतसिंबंधीं मि. हॅरोल्ड स्टासेन ह्यांनीं कांहीं माहिती जाहीर केली आहे. मि. स्टासेन हे अमेरिकेच्या परराष्ट्रीय मदतसंघटनेचे व्यवस्थापक म्हणून काम करतात. ते म्हणाले कीं येत्या एप्रिलमध्यें प्रे. आयसेन होवर अमेरिकन कॉंग्रेसकडे ह्याविषयीं एक विस्तीर्ण योजना पाठविणार आहेत. ह्या योजनेंत ज्या देशांना मदत करण्याविषयीं शिफारस करण्यांत येईल, त्यांत अफगाणिस्थानपासून जपान–कोरिआपर्यंतच्या द. आशिआंतील राष्ट्रांचा समावेश असेल. ह्या देशांना मिळावयाच्या आर्थिक मदतींत लक्षांत भरण्यासारखी वाढ करण्यांत येईल. अणुशक्तीचा उपयोग करून देण्याचाहि एक कार्यक्रम योजनेंत समाविष्ट करण्यांत येणार आहे. मि. स्टासेन हे मदत द्यावयांत येणाऱ्या देशांत ३०,००० मैलांचा प्रवास करून नुकतेच अमेरिकेला परत गेले आहेत. अमेरिकेनें पुढील वर्षी आशिआंतील देशांना द्यावयाच्या मदतीचा एक मोठा विस्तृत आराखडा तयार केला होता. परंतु नंतर मदतीच्या कार्यक्रमांत कांहीं कपात करण्यांत आली. अमेरिकेन सरकारचीं जीं जीं खातीं आर्थिक मदतीशीं संबंधित होतीं, त्या त्या खात्यांच्या प्रमुखांत वाटाघाटी होऊन मदतींत कपात करण्यांत आली. अमेरिकेच्या अर्थखात्याचा मोठ्या प्रमाणावर मदत करण्याला विरोध होता. अर्थखात्याचें म्हणणें असें आहे कीं, खुद्द अमेरिकेच्या अंदाजपत्रकाचीं तोंडमिळवणी होत नसतांना कोट्यावधि डॉलर्सची रक्कम परदेशांवर खर्च करण्यांत यावी, ही गोष्ट योग्य नाहीं. अखेर, सर्व संबंधित खातें प्रमुखांची बैठक भरविण्यांत आली आणि सर्वांनी मिळून मदतीचा नवा कार्यक्रम आंखला, अशी माहिती मि. स्टासेन ह्यांनीं दिली.

---

## कागदपत्रांचा नाश करणारें यंत्र

सरकारी खातीं, इस्पितळें, बँका, संशोधन–संस्था, कारखाने, ह्यांना कित्येक गुप्त कागदपत्रांचा नाश करावा लागतो, व ती एक मोठी अवघड बाब होऊन बसते. एका यंत्राचे योगानें हें काम व्यवस्थित होऊं शकतें. टाइपरायटरच्या आकाराच्या ह्या यंत्राचें वजन ५० पौंड असतें व तें विजेवर चालतें. वीज फारच कमी लागते. एक अष्टमांश इंच रुंदीच्या पट्ट्यांत कागदपत्रांचे तुकडे केले जातात, त्यामुळें अक्षरें ओळखणें अशक्य होतें. ह्या कपट्यांचा पॅकिंगसाठीं चांगला उपयोग होतो. यंत्रांत दर तासाला ५० पौंड कागदाचा नाश करतां येतो.

---

## सिक्कीममधील खेड्यांत जाण्यास सावकारांना बंदी

सिक्कीमच्या महाराजांनीं एक हुकूम काढून सावकारांना खेडेगांवांत कर्जवसुलीसाठी प्रवेश करण्यास बंदी केली आहे. बाजारांतच त्यांनीं आपले व्यवहार करावयाचे आहेत. खेडुतांच्या हितासाठीं हा हुकूम काढण्यांत आला असल्याचा खुलासा करण्यांत आला आहे.

---

## प्रत्येक उंदरामागें एक आणा

नाग हिल्स जिल्ह्यांत मारलेल्या प्रत्येक उंदरामागें एक आणा बक्षीस आसाम सरकारनें जाहीर केलें आहे. ह्यासाठी ६२,५०० रु. ची तरतूद करण्यांत आली आहे.

## खेड येथील सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें खेड येथें ता. १५।१।५५ ते १६।३।५५ पर्यंत सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग घेण्यांत आला. या वर्गांत एकूण ४३ विद्यार्थ्यांनीं नांवें दाखल केलीं होतीं. यांत ११ ग्रुपसेक्रेटरी व बाकीचे इतर विद्यार्थी होते. सदर वर्गास खेड तालुका को–ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन, पुणें जिल्हा सहकारी बँकेचे कार्यकर्ते व इतर सहकारी अधिकारी यांनीं वेळोवेळीं मार्गदर्शन केलें. या वर्गाचा समारोप समारंभ श्री. वि. ज. करंदीकर बी. ए, एलएल. बी., चेअरमन, पुणें जिल्हा सहकारी बँक यांचे अध्यक्षतेखालीं ता. ६।३।५५ रोजीं झाला. या वर्गाची परीक्षा ता. १४–३–५५ ते १६–३–५५ अखेर झाली. परीक्षेस एकूण ३२ विद्यार्थी बसले होते. ता. १६–३–५५ रोजीं विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन श्री. डी. ए. कुलकर्णी, बँक एजंट शाखा खेड यांचे अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळीं श्री. पारखी, श्री. दाते, श्री. गुंडगळ वगैरे विद्यार्थ्यांनीं सेक्रेटरीचें ग्रामीण जीवनांतील कर्तव्य या विषयावर चर्चा केली. नंतर श्री. डी. ए. कुलकर्णी यांनीं विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पहिल्या व दुसऱ्या क्रमांकानें पास होणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुक्रमें रु. ३ व रु. २ अशीं बक्षिसें जाहीर केलीं व उपदेशपर भाषण केलें. श्री. अभ्यंकर यांनीं बोर्डातर्फे त्यांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

---

## अमेरिकन बैलांचें विमानानें आगमन

बंगलोर येथें सहा अमेरिकन (जर्सी) अवलादी बैल के एल एम विमानानें दि. १५ रोजीं दाखल झाले. त्यांच्या स्वागतासाठीं डेअरी हसबंडी अधिकारी, श्री. रंगस्वामी, विमानतळावर हजर होते. यु. स्टे. टेक्निकल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशनची ही देणगी असून, बैलांचा पुरवठा हेफर प्रॉजेक्ट इन्कॉर्पोरेटेडनें केलेला आहे. बैलांच्या प्रवासाला सहा दिवस लागले. ह्या बैलांच्या सहाय्यानें निपजलेल्या दुभत्या गाईंनीं प्रत्येक वेतास १०,००० पौंड दूध दिलें असून दुधांतील चरबीचें प्रमाण ५·५% होतें. हे सहा बैल बंगलोर येथील स्टड फार्मांत ठेवण्यांत येतील.

---

**सरकारी मालकीची शेती**— काश्मीर सरकारनें लडाख भागांत एक समाज–विकास योजना चालू केली आहे. ह्या योजनेप्रमाणें लडाख जिल्ह्यांत सरकारी मालकीचीं दोन आदर्श शेतें कसण्यांत येणार आहेत. योजनेसाठी सरकारनें ५०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**भारतीय कादंबरीला बक्षीस**—सरदार कुलवंतसिंग ह्यांनीं लिहिलेल्या कादंबरीला अमेरिकेंतील एका प्रकाशक कंपनीनें बक्षीस दिलें आहे. भारतीय ग्रंथकारासाठी कंपनीतर्फे ठेवण्यांत आलेल्या स्पर्धेचा निकाल म्हणून ग्रंथकाराला १,००० डॉलर्सचें बक्षीस देण्यांत आलें. स्पर्धेसाठी २६५ पुस्तकें आलीं होतीं. भारताच्या फाळणीच्या वेळची सरहद्दीवरील एका खेड्यांतील कथा कादंबरींत सांगण्यांत आली आहे.

**भारतीय दारूवर जकात**—सिकिमच्या सरकारनें भारतामधून आयात होणाऱ्या दारूवर जकात बसविण्याचें ठरविलें आहे. ह्या जकातीमुळें राज्याच्या उत्पन्नांत २ लाख रुपयांची भर पडेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. राज्याचें एकूण उत्पन्न ३९ लाखांच्या आसपास आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. न. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.